अमरावती जिल्हयातील तिवसा, चांदूर रेल्वे व धामणगाव रेल्वे या ३ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका-२०१९
निर्वाचक गणांची रचना व आरक्षण सोडत कार्यक्रम

सत्यमेव जयते

निवडणूक तात्काळ

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:-रानिआ/जिपपंस-२०१९/प्र.क्र.२०/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २५/१०/२०१९

प्रति,
विभागीय आयुक्त, अमरावती
जिल्हाधिकारी, अमरावती

विषय :- अमरावती जिल्हयातील तिवसा, चांदूर रेल्वे व धामणगाव रेल्वे या ३ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका-२०१९ निर्वाचक गणांची रचना व आरक्षणाची सोडत काढण्याचा कार्यक्रम

संदर्भ :- १) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/जिपपंस/२०११/ प्र.क्र.१२/का.७, दिनांक २९/०९/२०११
२) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/जिपपंस/२०१६/ प्र.क्र.१६/का.७, दि.१८/०८/२०१६

महोदय,

सन २०११ च्या जनगणनेवर आधारित अमरावती जिल्हयाच्या ग्रामीण लोकसंख्येनुसार आयोगाचे संदर्भांकित अ.क्र. २ समोरील दिनांक १८/०८/२०१६ च्या पत्रान्वये जिल्हा परिषदेसाठी पंचायत समितीनिहाय ५९ इतकी सदस्य संख्या निश्चित केली असून त्यानुसार सन २०१७ मध्ये अमरावती जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १४ पैकी ११ पंचायत समित्यांची (तिवसा, चांदूर रेल्वे व धामणगांव रेल्वे वगळता) सार्वत्रिक निवडणूक पार पाडली आहे. तथापि, तिवसा, चांदूर रेल्वे व धामणगाव रेल्वे या ३ पंचायत समित्यांची मुदत दिनांक १४/१२/२०१९ रोजी संपणार असून त्यांची मुदत संपण्यापूर्वी तेथील सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण करावी लागेल.

२. राज्यातील धुळे, नंदूरबार, अकोला, वाशिम व नागपूर या ५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये आरक्षणाची टक्केवारी ५० टक्क्यापेक्षा जास्त होत असल्यासंदर्भात मा. उच्च न्यायालय, नागपूर व औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका दाखल झाल्या होत्या व सदर याचिकांत मा. उच्च न्यायालयाने उपरोक्त जिल्हा परिषद / पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका घेण्याच्या संदर्भात स्थगिती दिली होती. दरम्यान मा.सर्वोच्च न्यायालयासमोर विशेष अनुमती याचिका क्र.३३९०४-३३९१०/२०१७ दाखल

होऊन त्यामधील सुनावणीत उपरोक्त ५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका न झाल्याचे व जुन्याच समित्या अस्तित्वात असल्याचे निर्दशनास आल्यामुळे मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२८/०८/२०१९ रोजीच्या आदेशान्वये शासनाने नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची लोकसंख्या सदर आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्याच्या आत आयोगास उपलब्ध करुन न दिल्यास पूर्वीच्याच तरतुदीनुसार करण्यात आलेल्या आरक्षणाच्याआधारे निवडणूका घेण्याचे आदेशित केले. राज्य शासनाने आज दि.२५/१०/२०१९ रोजी संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या लोकसंख्येची कोणतीही आकडेवारी उपलब्ध करुन दिलेली नाही. संविधानातील तरतुदीनुसार जिल्हा परिषद / पंचायत समित्यांची मुदत संपण्यापूर्वी निवडणूका घेण्याच्या अनुषंगाने प्रभाग रचनेची कार्यवाही तात्काळ सुरु करणे आवश्यक आहे. उपरोक्त ५ जिल्हा परिषदांच्याबाबत असलेली वस्तुस्थिती या ३ पंचायत समित्यांबाबतही लागू होत असून सद्यस्थितीमध्ये या पंचायत समित्यांची मुदत संपण्यापूर्वी निवडणूक घेण्याकरिता त्यांच्या प्रभाग रचनेची कार्यवाही शासनाने यासंदर्भात दि.३० जुलै , २०१९ रोजी प्रख्याप्रित केलेला अध्यादेश रद्द होण्याची वाट न पाहाता करणे क्रमप्राप्त आहे.

३. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत अधिनियम, १९६१ च्या कलम ५८ मध्ये जिल्हा परिषद निवडणूक विभागाची दोन निर्वाचक गणांमध्ये विभागणी करण्यात येईल अशी तरतूद आहे. अमरावती जिल्हा परिषदेची सार्वत्रिक निवडणूक २०१७ मध्ये पार पडलेल्या उपरोक्त ३ पंचायत समिती क्षेत्रामधील जिल्हापरिषद निवडणूक विभागांची संख्या लक्षात घेता पंचायत समितीची सदस्य संख्या पुढीलप्रमाणे असेल:-

| अ.क्र. | पंचायत समितीचे नांव | पंचायत समिती क्षेत्रातील जिल्हा परिषद सदस्यांची संख्या | पंचायत समितीची सदस्य संख्या |
|---|---|---|---|
| १ | तिवसा | ३ | ६ |
| २ | चांदुर रेल्वे | ३ | ६ |
| ३ | धामणगाव रेल्वे | ४ | ८ |

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम ५८ मधील तरतूदीनुसार उपरोक्त ३ पंचायत समितीस अनुज्ञेय ठरत असलेल्या सदस्य संख्येबाबतचा तपशिल (आरक्षित प्रवर्गाच्या जागांसह) तयार करण्यात आला असून ते प्रपत्र- १ मध्ये केवळ उदाहरण म्हणून सोबत जोडला आहे. मात्र पंचायत समितीस देय असलेल्या जागा व त्यांचे आरक्षण निश्चित करणे ही जिल्हाधिकारी यांची जबाबदारी असल्याने सदरची आकडेवारी काळजीपुर्वक तपासून आवश्यक असल्यास त्यामध्ये योग्य ते फेरबदल राज्य निवडणूक आयोगाच्या निदर्शनास आणून दयावेत.

५. आता या पत्राद्वारे अमरावती जिल्हयातील तिवसा, चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे या ३ पंचायत समित्यांची प्रभाग रचना व आरक्षण निश्चिती करण्यासाठी खालीलप्रमाणे आदेश व प्रपत्र- २ मध्ये कार्यक्रम देण्यात येत आहे. प्रभाग रचना व आरक्षण सोडतीचे अधिकार जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांना आयोगाचे संदर्भिय पत्र क्र.१ अन्वये प्रदान करण्यात आले आहेत.

**आदेश**

६. प्रभाग रचना करण्याचे मुख्य टप्पे खालीलप्रमाणे आहेत :-

(i) जिल्हाधिकारी यांनी प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभागासह) तयार करणे व विभागीय आयुक्त यांना सादर करणे.

(ii) विभागीय आयुक्तांनी प्रारुप प्रभाग रचनेस (आरक्षणासह) मान्यता देणे.

(iii) जिल्हाधिकारी यांनी नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील / सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसह) आरक्षणाची सोडत काढणे.

(iv) सोडतीनंतर प्रारुप प्रभाग रचना (आरक्षणासह) राजपत्रात इ. प्रसिध्द करणे

(v) जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर विभागीय आयुक्त यांनी सुनावणी देणे.

(vi) विभागीय आयुक्त यांनी अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे व त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना राजपत्रात इ. प्रसिध्दी देणे.

७. तरी प्रभाग रचना करताना जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

(७.१) प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभागासह) तयार करणे व विभागीय आयुक्त यांना सादर करणे:-

(i) महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या (जागांच्या आरक्षणाची पध्दत व चक्रानुक्रम) नियम,१९९६ मधील तरतुदीनुसार व राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक रानिआ/जिपपंस-२०११/प्र.क्र१४/का.७, दि. ४/१०/२०११ व दि. ११/०६/२०१४ (प्रत संलग्न) अन्वये जिल्हाधिकारी यांनी निवडणूक विभाग व निर्वाचक गण यांची अनुसूचित जात व अनुसूचित जमाती यांच्या आरक्षणासह प्रारुप विहित मुदतीत विभागीय आयुक्त यांना सादर करावेत. आरक्षण चक्रानुक्रमे

फिरविण्याच्या प्रयोजनार्थ सन २०१९ ची चौथी निवडणूक आहे. त्यामुळे सन २००४,२००९ व २०१४ मध्ये असलेले आरक्षण विचारात घेवून या निवडणूकीमध्ये आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे आवश्यक आहे.

(ii) उपरोक्त दि. ०४/१०/२०११ च्या आदेशात नमूद परिच्छेद-२(६-अ) बाबत स्पष्ट करण्यात येते की, अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या निवडणूक विभाग/निर्वाचक गणाची लोकसंख्या १० टक्के मर्यादेपेक्षा कमी किंवा जास्त होत असल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी त्याबाबत समर्थनीय कारणे नमूद करुन प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव विभागीय आयुक्त यांना सादर करावा. विभागीय आयुक्त यांनी जिल्हाधिकारी यांनी दिलेली कारणे संयुक्तिक आहेत किंवा नाहीत हे तपासून प्रारुप प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देण्यासंदर्भात त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा.

**(७.२) जिल्हाधिकारी यांनी सादर केलेल्या प्रारुप प्रभाग रचनेच्या (अनुसूचित जात व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभागासह) प्रस्तावांना विभागीय आयुक्तांनी विहित मुदतीत मान्यता द्यावी.**

(७.३) **नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला आरक्षणाची सोडत :-**

प्रारूप प्रभाग रचनेस विभागीय आयुक्त यांचेकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त परिच्छेद महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या (जागांच्या आरक्षणाची पध्दत व चक्रानुक्रम) नियम, १९९६ मधील तरतुदीनुसार व राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक- रानिआ/जिपपंस-२०११/प्र.क्र.१४/का.७, दिनांक ०४/१०/२०११ व दिनांक ११/०६/२०१४ नुसार नागरिकाचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसह) यांच्या आरक्षणाची सोडत काढण्याबाबतची जिल्हाधिकारी यांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावी :-

अ) पंचायत समित्यांच्या बाबतीत तालुक्याच्या मुख्यालयी संबंधित तहसिलदारांकडून काढण्यात यावी.

ब) तालुका मुख्यालयात काढण्यात येणाऱ्या सोडतीवर देखरेख ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक पंचायत समित्यांकरिता एक उपजिल्हाधिकारी यांची नेमणूक करावी.

क) निवडणूक विभाग, निर्वाचक गणांच्या हद्दी दर्शविणारा नकाशामध्ये विभाग व गण यांचे क्रमांक व त्यांच्या व चतु:सीमा स्पष्ट कराव्यात व हा नकाशा सोडतीसाठी येणाऱ्या नागरिकांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावावा.

ड) सोडतीसाठी पारदर्शक ड्रम / काचेचा बॉक्स वापरावा व त्यामध्ये टाकावयाच्या चिठ्ठयांचा आकार १५ x १५ से.मी.पेक्षा जास्त नसावा. त्यावर लावण्यात येणारे रबरबॅण्ड एकाच रंगाचे असावेत.

इ) सोडतीसंबंधीच्या सूचनेस जिल्हास्तर व तालुकास्तरावर नेमून दिलेल्या दिनांकास मोठया प्रमाणात प्रसिध्दी दयावी. उदा.

(a) जिल्हाधिकारी, तहसिलदार, जिल्हा परिषद व पंचायत समिती कार्यालयातील सूचना फलकावर

(b) जिल्हा कार्यालय/जिल्हा परिषदेची वेबसाईट

(c) जिल्हयातील जास्त वाचकवर्ग असलेल्या वर्तमानपत्रात.

(d) केबल टि.व्ही. व इतर माध्यमे, इत्यादी

**(७.४) सोडतीनंतर प्रारुप प्रभाग रचना (आरक्षणासह) प्रसिध्द करणे .**

(अ) नगर परिषदा /नगर पंचायतीच्या बाबतीत "महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५" मधील तरतुदीनुसार सर्व आरक्षण नमूद करुनच प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात येते. त्याच धर्तीवर जिल्हा परिषद / पंचायत समित्यांमध्ये देखील सोडतीमध्ये आलेले आरक्षण नमूद करुनच प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात येते. राज्य निवडणूक आयोगाकडून राबविण्यात येत असलेली कार्यपध्दती योग्य असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्रमांक-३६४८/२००८ मध्ये दिलेल्या निर्णयात नमूद केलेले आहे. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समान पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक असल्याने, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिलांसह) यांच्याकरिता प्रभाग आरक्षित करुनच प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिध्द करावी.

(ब) प्रारुप प्रभाग रचनेच्या अधिसूचनेस व त्यावर हरकती व सूचना स्विकारण्याचा कालावधी व स्विकारण्यास सक्षम असलेले प्राधिकारी यांचा तपशील यास व्यापक प्रसिध्दी द्यावी. (उदा. वृत्तपत्रे, जिल्हाधिकारी तसेच तहसिल कार्यालयाचे नोटीस बोर्ड, वेबसाईट इत्यादी.)

**(७.५) प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देणे :-**

(अ) जिल्हा परिषद, पंचायत समिती प्रारुप प्रभाग रचनेवर विहित मुदतीत प्राप्त हरकती जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांनी संकलित करुन त्या विभागीय आयुक्तांना सादर कराव्यात.

(ब) प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त हरकतींवर विभागीय आयुक्त यांनी स्वत: सविस्तर सुनावणी दयावी. असे करीत असताना जास्तीत जास्त पारदर्शकता राखली जाईल याची काळजी घ्यावी. निकाली काढण्यात येणाऱ्या हरकतींबाबतही, संबंधीतांना कायदयातील तरतुदी, भौगोलिक रचना, बदलांची आवश्यकता / अनावश्यकता यांच्याआधारे योग्य तो खुलासा करावा, जेणेकरुन न्यायप्रविष्ठ प्रकरणे कमी होतील. मात्र हरकतदारांना लेखी उत्तर देण्याची आवश्यकता नाही.

(क) सुनावणीनंतर विभागीय आयुक्त यांनी निवडणूक विभाग / निर्वाचक गणाची प्रभाग रचना व आरक्षण अंतिम करावे.

(७.६) **अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे व प्रसिध्दी करणे-**

विभागीय आयुक्त यांनी निवडणूक विभाग / निर्वाचक गणाची प्रभाग रचना व आरक्षण अंतिम केल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी त्यासंबंधीची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करावी व सदर अधिसूचनेस व्यापक प्रसिध्दी द्यावी. (उदा. वृत्तपत्रे, जिल्हाधिकारी तसेच तहसिल कार्यालयाचे नोटीस बोर्ड, वेबसाईट इत्यादी.) तसेच अंतिम प्रभाग रचनेच्या राजपत्रात प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेच्या दोन प्रती राज्य निवडणूक आयोगास पाठविण्यात याव्यात.

८. सर्वसाधारण या आदेशासंदर्भात कोणतीही अडचण अथवा शंका असल्यास यासंदर्भात खुलासा करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाचे असतील.

९. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची प्रभाग रचना अंतिमरित्या प्रसिध्द होईपर्यंत सर्व टप्प्यांवरील माहिती (विहित नमुन्यात) आयोगाच्या कार्यालयास ई-मेल sec.mh@gov.in वर वेळच्यावेळी पाठविण्यात यावी.

१०. वरील नमूद प्रकरणांबाबत न्यायालयाचे अन्य काही आदेश असल्याबाबत जिल्हाधिकारी यांनी खातरजमा करावी आणि जर काही न्यायालयाचे आदेश असतील तर त्वरित राज्य निवडणूक आयोगाच्या निदर्शनास आणावेत.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

सहपत्र- प्रपत्र- १ व २

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:- प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम इमारत, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/जिपपंस-२०१९/प्र.क्र.२०/ का.७, दि.२५/१०/२०१९ सोबतचे प्रपत्र)

प्रपत्र-१

अमरावती जिल्हा परिषदेतील तिवसा, चांदूर रेल्वे व धामणगाव रेल्वे या ३ पंचायत समिती क्षेत्रनिहाय तपशिल तसेच पंचायत समित्यांना अनुज्ञेय ठरत असलेल्या जागांचा तपशील

| SR. NO. | DISTRICT | PANCHAYAT SAMITI | CENSUS POPULATION 2011 | | | ADMISSIBLE SEATS | | TOTAL WOMEN | Reservation | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | GEN | | SC | | ST | | BCC | |
| | | | TOTAL | SC | ST | ZP | PS | | T | W | T | W | T | W | T | W |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1 | Amravati | Teosa | 92246 | 15283 | 3586 | 3 | 6 | 3 | 3 | 2 | 1 | 0 | 0 | 0 | 2 | 1 |
| 2 | | Chandur Railway | 77131 | 16506 | 4141 | 3 | 6 | 3 | 3 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 2 | 1 |
| 3 | | Dhamangaon Railway | 111856 | 19368 | 8992 | 4 | 8 | 4 | 4 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 2 | 1 |

तिवसा पंचायत समितीमध्ये मागील निवडणुकीप्रमाणेच यावेळीही अनुसूचित जाती या प्रवर्गाकरिता १ जागा आरक्षित होत असून मागील निवडणुकीमध्ये सदर जागा अनुसूचित जाती (स्त्री) या प्रवर्गासाठी आरक्षित होती. त्यामुळे आता सदर जागा अनुसूचित जाती (स्त्री) या प्रवर्गासाठी आरक्षित होणार नाही.

चांदूर रेल्वे व धामणगाव रेल्वे या २ पंचायत समित्यांमध्ये मागील निवडणुकीप्रमाणेच यावेळी अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी १ जागा आरक्षित होत असून मागील निवडणुकीमध्ये सदर जागा अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी आरक्षित होती. त्यामुळे आता सदर जागा अनुसूचित जाती (स्त्री) या प्रवर्गासाठी आरक्षित होईल.

धामणगाव रेल्वे या पंचायत समित्यांमध्ये मागील निवडणुकीप्रमाणेच यावेळी अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी १ जागा आरक्षित होत असून मागील निवडणुकीमध्ये सदर जागा अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी आरक्षित होती. त्यामुळे आता सदर जागा अनुसूचित जमाती (स्त्री) या प्रवर्गासाठी आरक्षित होईल.

प्रपत्र-२

(आयोगाचे पत्र क्र.रानिआ/जिपपंस-२०१९/प्र.क्र.२०/का.७,दि.२५/१०/१९सोबतचे प्रपत्र)

**अमरावती जिल्हयातील तिवसा, चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे या ३ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता प्रभाग रचना व आरक्षण सोडतीचा कार्यक्रम**

| अ.क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे | टप्पा सुरु करण्याचा / संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | **अ) प्रारुप प्रभाग रचना आरक्षणासह** | | |
| १. | **प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (अनुसूचित जाती/ अनुसूचित जमातीकरिता आरक्षणासह) विभागीय आयुक्त यांच्याकडे सादर करणे** (जिल्हा परिषद क्षेत्राची निवडणूक विभागामध्ये व पंचायत समिती क्षेत्राची निर्वाचक गणामध्ये विभागणी करून) | जिल्हाधिकारी | ३१/१०/२०१९ (गुरुवार) पर्यंत |
| २. | प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देणे | विभागीय आयुक्त | ०२/११/२०१९ (शनिवार) पर्यंत |
| ३. | **आरक्षण सोडतीची सूचना वृत्तपत्रात प्रसिध्द करणे** {नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील / सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसह) बाबत} | जिल्हाधिकारी | ०३/११/२०१९ (रविवार) |
| | **आरक्षणाची सोडत काढणे** {नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील / सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसह) बाबत} | तहसिलदार | ०५/११/२०१९ (मंगळवार) |
| ५. | **प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना प्रसिध्द करणे** (निवडणूक विभाग / निर्वाचक गण रचना व आरक्षणासह) | जिल्हाधिकारी | ०६/११/२०१९ (बुधवार) |
| | **ब) हरकती व सूचना तसेच सुनावणी** | | |
| ६. | जिल्हाधिकारी यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी | | ०६/११/२०१९ (बुधवार) ते ०८/११/२०१९ (शुक्रवार) |
| ७ | प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देऊन निवडणूक विभाग /निर्वाचक गण रचना अंतिम करणे | विभागीय आयुक्त | ११/११/२०१९ (सोमवार) |
| | **क) अंतिम प्रभाग रचना** | | |
| ८. | अंतिम प्रभाग रचना व आरक्षण शासन राजपत्रात प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | ११/११/२०१९ (सोमवार) |

टिप :- विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील नोडल ऑफीसर यांनी प्रत्येक टप्प्यावरील कामकाजाबाबत आयोगास अहवाल सादर करावा.

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र